बहुजन हिताय जगत शिक्षण संस्था गोंदियाद्वारा संचालित

जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल

विज्ञान महाविद्यालय, गोरेगाव,

जि. गोंदिया (म.रा.) ४४१८०१

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित

नॅक बंगलोरद्वारा 'बी' श्रेणीने पुनर्मूल्यांकित

E-mail : principal_jagatcollege@rediffmail.com

**Website : www.jagatcollege.net.in**

ISBN 978-93-82962-92-2
9 789382 962922



विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत व मराठी विभागद्वारा आयोजित

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## राष्ट्रीय चर्चासत्र

# जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये

**गुरुवार, दि. ३० मार्च २०१७**

## शोधनिबंध पुस्तिका



बहुजन हिताय जगत शिक्षण संस्था गोंदियाद्वारा संचालित

जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय

गोरेगाव, जि. गोंदिया (म.रा.) ४४१८०१

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित

नॅक बंगलोरद्वारा 'बी' श्रेणीने पुनर्मूल्यांकित

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

❖ प्रकाशक :

**मेहेरबाबा पब्लिशर्स**
हसनबाग पोलिस चौकी जवळ,
हसनबाग रोड, न्यु नंदनवन, नागपूर-९
मो. ९९२३६३०३१५, ८०८७४६०४७०

जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये

❖ © सर्व हक्क प्रकाशकाधीन

❖ प्रथम आवृत्ती : मार्च, २०१७

❖ ISBN- 978-93-82962-92-2

या शोधनिबंध पुस्तिकेतील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते व मजकूर लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, परीक्षण समिती व संपादक समिती सहमत असतीलच असे नाही.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

Rashtrasant Tukadoji MaharaJ Nagpur University
"(Established by Government of Central Provinces Education Department by Notificadon No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act.1994)"

Dr. Siddharthavinayaka P. Kane
Ph. D.
Vice-Chancellor

डॉ. सिद्धार्थविनायक प. काणे
पीएच.डी.
कुलगुरू

Office: Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Premises, Ravindranath Tagore Marg, Nagpur - 440 001
Tel.: 0712-2523045, Fax: (0712) 2555701 / E-mail : vc@nagpuruniversity.nic.in



## शुभेच्छा संदेश

गोरेगाव, जि. गोंदिया स्थित **जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालयाचे** मराठी विभागाद्वारे विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत **"जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये"** या विषयावर दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन होत असून या निमित्य महाविद्यालयाद्वारे स्मरणिका प्रकाशित करण्यात येत आहे हे ऐकून आनंद वाटला.

जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्य या विषयाशी संबंधित विविध पैलूंवर या चर्चासत्रात मंथन होऊन सदर चर्चासत्राचा संबंधित विद्यार्थी, शिक्षक व समाजास उपयोग होईल, असा मला विश्वास वाटतो.

चर्चासत्राचे आयोजनासाठी मी प्राचार्यांचे अभिनंदन करून सफल आयोजनास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

नागपूर, मार्च २७, २०१७

डॉ. सिद्धार्थविनायक प. काणे)

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# ८. लो नाट्याच्या प्रभावातून निर्माण झालेल्या वैश्विक कलाकृती

**प्रा. दिलीप घोनमोडे**
म. गांधी महाविद्यालय,
आरमोरी

**प्रस्तावना:**

देवी देवता किंवा विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या अनियंत्रित अदृश्य शक्तीच्या उपासनेतून, यातुविधीतून भारतात व पाश्चात्य देशात लोकनाट्य सुरू झाले. **'इंडियन एंटिक्वेरी'** या मुंबई येथून सुरू झालेल्या नियतकालिकातून याचा अभ्यास प्रथम एकोणिसाव्या उत्तरार्धात भारतात सुरू झाला. त्यानंतर **'न्यू इंडियन एंटिक्वेरी'** आणि **'अंथ्रोपोलाजीकल सोसायटी'** तर्फे निघालेल्या नियतकालिकातून लोकवाङ्मयाच्या विविध प्रकारांवर चर्चा करण्यात आली. पुढे महाराष्ट्र लोकसाहित्य समितीने लोकसाहित्याचे संकलन १७ खंडातून केले. यामध्ये लीच मारीया यांनी १९४९ ला संपादित केलेल्या **'डिक्शनरी ऑफ फोकलोअर, मिथालॉजी, अ‍ॅन्ड लिजेंड'** या ग्रंथाचा मोलाचा वाटा आहे.

**लोकनाट्य व लोकसाहित्य:**

लोकनाट्य हे लोकसाहित्याचा एक प्रकार आहे. परंपरागत लोकजीवनाचा शब्दबद्ध आविष्कार म्हणजे लोकसाहित्य. यालाच लोकवाङ्मय असेही म्हटले जाते. तरीसुद्धा लोकवाङ्मय ही संकल्पना अधिक व्यापक आहे. लोकवाङ्मयात लिखित व अलिखित साहित्याचा समावेश होतो. लोकवाङ्मयात लोकनाट्य ह्या वाङ्मय प्रकाराचा समावेश होतो. लोकवाङ्मयाचे मुख्य वैषिट्य म्हणजे ते मौखिक व अलिखित स्वरूपाचे असते. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेतून पोहचले जाते. या प्रवाहाद्वाराचे हजारो वर्षापासून अप्रगत अवस्थेतून प्रगत जीवनाकडे मनुष्य प्रवाह चालत आला. लोककथा, लोकगीते, लोकनाट्य हे लोकसाहित्याचे विविध अंग आहेत. लोकमानसाचा समाज-संस्कृती, जीवनधर्म-निष्ठा, कलात्मक आविष्कार तीन प्रकारातून होतो. भाषिक आविष्कार, अभाषिक आविष्कार आणि लोकाचाररूप आविष्कार. भाषिक आविष्कार म्हणजेच लोकगीते, लोककथा, दंतकथा, दैवतकथा, म्हणी, उखाणे, मंत्रतंत्र, शिव्या इत्यादी. अभाषिक आविष्कारात लोकचित्रे लोकशिल्पे, लोकनृत्ये, लोकनाट्ये (अभाषिक मुकनाट्ये) इत्यादी; तर लोकाचाररूप आविष्कारात लोकदैवत, त्याचे सण, उत्सव, लोकश्रद्धा, लोकभ्रम, खाणेपिणे, वेशभूषा, रंगभूषा, खेळ, जादूटोणा, चेटूक इत्यादी.



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College
Armori, Dist - Gadchiroli
M.G. Art's, Science & late N.P. College, Armori

लोकनाट्य, लोकवाङ्मय, लोकविद्या:

या संज्ञेत लोक हा शब्द एका विशिष्ट अर्थाचा आहे. लोक म्हणजे सामान्य जनता. Comman people केवळ ग्रामीण लोकच नाही तर खेड्यात आणि शहरात राहणारे लोक. जे परंपरेने चालत आलेले जीवन जगतात. यात प्रामुख्याने अनार्य, शूद्र समजला जाणारा बहुजन समाज होय. ही आद्य संस्कृती आहे. आणि तिच्यातून जुन्यात जुनी परंपरा, लोकांच्या जीवनविषयक सवयी, रूढी, गीते, नृत्य, कृतीउक्तींना लोकविद्या म्हणतात. या लोकविद्येला ग्रंथाचा कोणताही आधार नसतो. शिक्षित अशिक्षित या कृतीत परंपरा म्हणून सहभागी होतात. तेथे समूहाच्या संवेदना, भावना असतात.

लोकविद्येत आदिम कालापासून चालत आलेल्या लोकसंस्कृतीचा आविष्कार असतो. त्यामुळे लोकविद्येच्या अभ्यासाशिवाय लोकसंस्कृतीचा अभ्यास अपूर्ण ठरतो. या कारणामुळेच मानवंशशास्त्रज्ञांनी, मानवशास्त्रज्ञांनी प्रथम याकडे लक्ष दिले. आजचे साहित्य व कला ही लोकसाहित्य आणि लोककला यातून उत्क्रांत झाली.

**लोकनाट्य:**

इतिहास संशोधक महामहोपाध्याय वि. का. राजवाडे यांनी लोकनाट्याचा उगम आर्यपूर्वजांच्या अग्नीवरील भक्तीशी जोडला. अग्निभोवती (यज्ञ) होणाऱ्या रानटी पूर्वजांच्या चालीरीतीच्या नकले पासून नाट्यकला जन्माला आली असे त्यांचे मत आहे. लोककल्याणासाठी कुणीतरी बळी जाणे आवश्यक आहे. या कल्पनेत नाट्य होते. पुढे नरमेधाची कल्पना प्रतीकरूपाने अश्वमेधात आली. पशूंचे बळी देण्यात हीच कल्पना परिवर्तीत झाली. भरतमुनीने इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात नाट्यशास्त्र लिहितांना ऋग्वेदापासून संवाद, सामवेदापासून गायन, यजुर्वेदापासून अभिनय आणि अथर्ववेदापासून रस घेऊन हा नाट्यवेद तयार झाला असे म्हटले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी **'वैदिक संस्कृतीचा विकास'** या ग्रंथात **'मूळ नाट्यशास्त्र हा शूद्रप्रणीत वेद होय'** असे म्हटले. आर्यांनी चातुर्वर्ण्य निर्मिले आणि एतद्देशियांना दास केले. या लोकसंस्कृतीच्या पोटी नाट्यवेद जन्माला आला असावा. या म्हणण्यात सत्यता आहे. कारण आजपर्यंत विकास पावत आलेल्या लोकनाट्याचा संबंध वेदकाळी शूद्रांनी स्वत:च्या जगण्यासाठी व मनोरंजनासाठी सोय म्हणून उभारलेल्या नाट्यवेदाशी संबंध लावता येतो.

वेदपूर्व काळापासून भारतात लोकसंस्कृतीमध्ये विविध प्रकारचे विधी प्रचलित होते. जेम्स फ्रेझर या लोकसाहित्य शास्त्रज्ञाने म्हटले, 'नाट्य हे सुफलीकरण विधीशी निगडित आहे. सुफलीकरण विधीतील नाट्यांश निराळे होऊन स्वतंत्रपणे विकसित होऊ लागले. त्यातून नाट्य साकार झाले'. म्हणूनच अग्निकुंडाभोवती होणारा प्रजोत्पादन विधी हाच नाटकाची गंगोत्री ठरतो. असा राजवाडे यांनी भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास या ग्रंथात दिलेली नाट्य उत्पत्ती खरी वाटते. दि. के. बेडेकर सुद्धा यज्ञनाट्य हेच नाट्याचा



मूलस्त्रोत आहे असे म्हणतात आणि ऋग्वेदातील संवाद हा नाट्याचाच पुरावा आहे. "भारतात प्राचीन काळापासून लोकनाट्य अस्तित्वात होते. विदग्ध संस्कृत नाटकाच्या उत्पत्तीत बऱ्याच प्रमाणात लोकनाट्याचा वाटा आहे. संस्कृत नाटकात आढळणाऱ्या गोष्टींचे मूळ हे प्राचीन लोकनाट्यात आहे".[१] हे ब्रिटिश पंडित कीथ याने मान्य केले आहे.

**नाट्योत्पत्तीचे जागतिक संदर्भ:**

ग्रिसमध्ये द्राक्षाच्या सुगीच्या मोसमात **'डायोनायसस'** या मद्यदेवतेच्या धार्मिक उत्सवात **'डिथिरॅन'** नामक कूंदगीते गात. यातून ग्रिक नाटकाचा उगम झाला. युरोपमध्ये मात्र अंत्यविधीचा संबंध लोकनाट्यास आहे. मृत शरीरावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर त्याचा शांतीपाठ म्हणून **'ममिंग प्ले'** नावाचा संस्कार होतो. तर ब्रिटिश बेटावर **'प्लाऊ मंडे प्ले'** नावाचा एक विधी वृक्ष झाडांची पानगड संपून नवीन पालवीच्या आगमनाचे स्वागत विधी म्हणून केला जातो. हे संस्कार नाट्यच आहे. तर **थॉमस हार्डी** यांच्या "Retern of play" या कादंबरीत **'सेंट जार्ज प्ले'** नावाचा विधी हा तेथील लोकनाटकाचा उगम मानला जातो. मात्र भारताबाहेर नाट्याचा उगम यातुविधी (मॅजिकल राईट) मधून झाला असे मानले जाते. कारण मानवी संस्कृतीच्या आदिपर्वातील समूह हे यातुविधीने भारलेले होते. यावरून लोकनाट्य हे केवळ भारतातच नाही तर जगाच्या अनेक देशात विविध संस्कारांनी केल्याचा उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतो.

**भारतात विविध प्रांतांत होणारी लोकनाट्ये–**

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र | : | दशावतार, ललित, खेळ, कठपुतळी, तमाशा, गोंधळ इत्यादी |
| माळवा | : | माच |
| उत्तरप्रदेश | : | नौटंकी |
| आग्रा | : | भगत |
| बंगाल | : | शैव नाटक गंभिरा, वैष्णव नाटक कीर्तनिया |
| आसाम | : | अंकियानाट |
| गुजरात | : | भवाई |
| राजस्थान | : | ख्याल, रम्मत, गवरी, भवाई |
| तमीळ | : | तेरूकुट्टू |
| कन्नड | : | यक्षगान, वयलाट, यल्लम्मा |
| आंध्रप्रदेश | : | कुरवंजी |
| पंजाब | : | रास, नकल |
| मलयाळम | : | काक्कारांशी |

**डायोनायसस:**

ग्रीक पुराण कथेनुसार डायोनायसस हा पुरूष देवता झ्युस आणि कॉडमसची कन्या सेमली हिचा पुत्र. तो थीब्झ येथे जन्मला. सेमलीच्या इच्छेवरून झ्युस विजेप्रमाणे प्रकट झाला आणि त्या प्रकाश तेजात सेमली जळून नष्ट झाली; परंतु त्यावेळी तिच्या पोटातील गर्भ वाचवून झ्युसने आपल्या मांडीत जगवला. नंतर जन्म व पालणपोषण सेमलीची बहिण आयनो हिने केले. पऱ्यांनी त्यास पर्वतावर वाढवले. या देवतेबाबत विविध जन्मकथा ग्रिक पुराणात आहेत. इ. स. पूर्व १२०० या कालखंडातील साहित्यात या देवतेचा उल्लेख आढळतो.

थ्रेस आणि प्रिजीया येथील लोक डायोनाययससशी तद्रुप होण्यासाठी मद्य पिऊन, बेभान होऊन नाचतात. हीच त्या देवतेची उपासना होय. डायोनायससला **'लायस'** म्हणजे भक्तांची चिंता हरण करणारी मद्यदेवता म्हटले जाते. इला प्रसन्न करण्यासाठी पशूंचा बळी दिला जातो. मुळात भारतातील **'यज्ञ'** संस्काराशी साम्य असलेला प्रसंग हे एक नाट्य आहे.

या व्यतिरिक्त नृत्यगीतांसह होणारी प्राचीन इंद्रदेव ध्वजपूजाविधीचा पूर्वरंग हा पाश्चात्य देशात होणाऱ्या **'मे-पोल'** या उत्सवाशी संबंध सांगणारा आहे. अतिप्राचीन इंडोयुरोपियन समाजात या उत्सवांचे मूळ सापडते.

**लोकनाट्याच्या प्रभावातून निर्माण झालेल्या आजच्या कला:**

या लोकनाट्याच्या तंत्र फार्मच्या प्रभावातून आज मराठी साहित्यात विजय तेंडुलकर यांचे **'घाशीराम कोतवाल'** या नाटकात संदर्भ दिसतात. महाराष्ट्रात कोकणी भागात कीर्तन, लावणी, बहुरूपी, विवाहगीत (ढवळे), कर्नाटकात यक्षगान हे नाट्यप्रकार आजही प्रचलित आहेत. गिरीश कर्नाड यांचे **'हयवदन'** हे नाटक देश विदेशात गाजले. यालाही लोककलेचाच मुलाधार आहे. कन्नड भाषेतील या नाटकाचा १९७३ ला अनुवाद झाला. यक्षगानच्या धरतीवर असलेल्या या नाटकाने प्रसिद्धीचे उच्चांक गाठले. सतीश आळेकर लिखित **'महानिर्वाण'** आणि रत्नाकर मतकरी यांचे 'लोककथा ७८' या नाटकात लोकनाट्यावर आधारीत प्रसंग उभे केले. दशावतार व महाराष्ट्रातील दंडार या लोकनाट्याचा वापर अनेक नाटकात केला गेला.

महाराष्ट्रात निर्माण झालेल्या **'पिंजरा'** या चित्रपटात 'तमाशा' या लोकनाट्याचा प्रभाव आहे. **'नटरंग'** या आनंद यादव लिखित कादंबरीवर आधारीत निर्माण झालेल्या चित्रपटात तमाशा लोकनाट्याची सुधारीत आवृत्ती आहे. व्यंकटेश माडगुळकर यांचे **'कुणाचा कुणाला मेळ नाही'**, **'दार उघड बया दार उघड'**, **'आतून तमाशा वरून कीर्तन'**, द. मा. मिरासदार यांनी लिहिलेले **'मी लाडाची मैना तुमची'** त्याचप्रमाणे आनंद यादव लिखित **'रात घुंगराची'** इत्यादी नाटकांचा उल्लेख लोकनाट्य प्रभावित



नाटक म्हणून करता येईल. **'जोगवा'** या चित्रपटातील **'देवदासी'**चा नृत्यप्रकार हा सुद्धा लोकनाट्याचाच प्रकार आहे. एकुणच मराठी अमराठी अनेक कलाप्रकारावर लोकनाट्याचा प्रभाव आजही दिसतो. यामुळेच आजच्या नाट्यकला या लोकनाट्यातूनच विकसित झाल्या हे स्पष्ट आहे.

**पाश्चात्य नाटकांवर लोकनाट्याचा प्रभाव:**

१९७३ मध्ये **बर्टाल्ड ब्रेख्त** यांनी लिहिलेल्या **'काकेशियन चॉक सर्कल'** हे इंग्रजी नाटक तत्कालीन इंग्रजी लोकनाटकाच्या धरतीवर निर्माण झाले. महाराष्ट्रात **'अजब न्याय वर्तुळाचा'** असे या नाटकाचे रूपांतर सुद्धा झालेले आहे. इब्सेन व जॉन बर्नाड शॉ यांनी निर्माण केलेल्या अनेक नाटकांवर प्राचीन लोकनाट्याचा प्रभाव आहे. ब्रेख्तच्या प्रभावातून बंगालमध्ये Revolutionary People Theatre ची निर्मिती झाली आहे. जगात **'पॉप'** संगीत म्हणून धुमाकुळ घालत असलेला नृत्यप्रकार सुद्धा लोकसंगीताची सुधारित आवृत्ती आहे. सेक्सपियरच्या **'हॅम्लेट'** मधील आईचा व्यभिचार, वडीलाचा खून यावर प्राचीन लोककथांचा प्रभाव आहे. जॉन वेब्स्टरयांचे डचेसऑफ मॉल्फी, ख्रिस्तोपर मार्लो यांचे डॉ. फॉस्टस, टी. एस. इलियट यांच्या मर्डर इन कॅथेड्रल, फॅमिली रीयुनियनया नाटकांवर तत्कालीन लोकनाट्य व लोककथाचा प्रभाव जाणवतो.

**निष्कर्ष**

१) विदेशात व स्वदेशात यातुविधी किंवा विश्वाला नियंत्रित करणाऱ्या अलौकिक शक्तींना आपल्या संरक्षक मानून त्यांची वेगवेगळ्या प्रकारे उपासना करणे यातून लोकनाट्याची निर्मिती झाली.

२) महाराष्ट्रात दंडार, तमाशा, कर्नाटकात यक्षगान इत्यादी अनेक प्रदेशात विविध प्रकारचे लोकनाट्य आजही जिवंत आहेत.

३) लोकनाट्यातूनच नाट्यकला निर्माण झाली.

४) भारतीय व जागतिक स्तरावरील अनेक नाटकात आजही लोकनाट्याचा प्रभाव जाणवतो.

**संदर्भग्रंथ सूची**


१) मराठी वाङ्मयकोश खंड ४

२) मराठी विश्वकोश खंड ६, १५

३) लोकनाट्य : दशा आणि दिशा, स्मरणिका, भिवापूर महा. भिवापूर


***